

या देवी सर्वभूतेषु मातृरुपेण संस्थिता,
नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नम:

नवरात्रोत्सव निमित्त शुभेच्छा

॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे



माता शैलपुत्री
ही नवदुर्गांपैकी पहिली देवी असून ती नवरात्रीच्या पहिल्या दिवशी पूजली जाते.

अहिल्यानगर | रविवार, दि. ११ ऑक्टोबर २०२६ | वर्ष ७ वे | अंक ९७ वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145


SPOT NEWS

## पुणे पदवीधरसाठी २३ ऑक्टोबर रोजी मतदान

**पुणे** – पदवीधर मतदारसंघामध्ये एका जागेसाठी चुरशीची लढत होणार असून शिक्षक मतदारसंघातील एका जागेसाठीची निवडणूक तिरंगी होणार आहे असे निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले आहे. येत्या २३ ऑक्टोबर रोजी मतदान होणार आहे. विधान परिषदेच्या पदवीधर मतदारसंघात भारतीय जनता पक्षाच्या वतीने डॉ. स्मिता जाधव तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाकडून हर्षदा देशमुख-जाधव यांच्यात थेट तर शिक्षक मतदारसंघात भारतीय जनता पक्षाकडून कौस्तुभ गावडे. काँग्रेस पक्षाकडून जयंत आसगावकर आणि राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांचे माजी स्वीय सहायक सचिन सानप हे निवडणुकीच्या रिंगणात असल्याने निवडणूक रंगतदार होईल अशी चिन्हे आहेत. दोन्ही मतदारसंघांतील उमेदवारांच्या माघारीची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले आहे. विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी पुणे विभागात प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे. दोन्ही मतदारसंघांसाठी येत्या २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान होणार असून, २७ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होणार आहे. पदवीधर मतदारसंघातून ४७, तर शिक्षक मतदारसंघातून ३० उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. पुणे विभागाच्या विभागीय आयुक्त शीतल तेली-उघले यांनी ही माहिती सांगितली. दोन्ही मतदारसंघांचे कार्यक्षेत्र पुणे विभागातील पुणे, सातारा, सांगली, सोलापूर आणि कोल्हापूर या पाच जिल्ह्यांमध्ये आहे. संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहत आहेत.

## सायबर गुन्ह्यांत बालकांचा सहभाग ७ पटींनी वाढला!

**नागपूर** – राज्यात विधीसंघर्षग्रस्त बालकांकडून घडणाऱ्या गुन्ह्यांचे स्वरूप दिवसेंदिवस गंभीर आणि चिंताजनक होत आहे. २०२३ या वर्षात अल्पवयीन मुलांवर भारतीय दंड संहितेअंतर्गत ३,५४८ तर विशेष व स्थानिक कायद्यांनुसार ४२२ गुन्हे दाखल झाले. एकूण बालगुन्हेगारांपैकी तब्बल ७९.८३ टक्के मुले ही १६ ते १८ वयोगटातील आहेत. शरीरावरील हल्ल्यांच्या हिंसक गुन्ह्यांसोबतच माहिती तंत्रज्ञान (आयटी) कायद्यांतर्गत बालकांवर दाखल गुन्ह्यांची सरासरी ७ पटींनी वाढल्याची धक्कादायक नोंद प्रकाशात आली. राज्य गुन्हे अन्वेषण विभागाने (सीआयडी) प्रसिद्ध केलेल्या 'क्राईम इन महाराष्ट्र-२०२३' या अहवालातील दुसऱ्या टप्प्यातून हे वास्तव समोर आणले आहे.

# राजधानी दिल्लीसह देशभरात धरपकड

### सीजेपीच्या कार्यकर्त्यांसह राजकीय नेतेही ताब्यात, विरोधक आक्रमक

**नवी दिल्ली | वीरभूमी** –

राजधानी दिल्लीत जंतरमंतरवर आज सीजेपीकडून आंदोलनाची हाक देण्यात आली. त्यानंतर कॉकरोच जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांसह युवक आणि सामाजिक, राजकीय क्षेत्रातील अनेक व्यक्ती जंतरमंतरच्या दिशेने जायला निघाले. परंतु तत्पूर्वीच संस्थापक अभिजीत दिपकेंसह सीजेपीच्या पदाधिकाऱ्यांना दिल्ली विमानतळावरच थेट विमानातून ताब्यात घेतले. तसेच माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि ममता बॅनर्जी यांनाही ताब्यात घेतले असून, राजधानी दिल्लीसह सर्वत्र धरपकड सुरू आहे. मुंबई, पुण्यातही सीजेपीला पाठिंबा देत आंदोलन करण्याचा प्रयत्न केला. परंतु तेथेही धरपकड करण्यात आली. दरम्यान, दिपकेंना अटक केल्यानंतर आंदोलनाची सूत्रे स्वीकारलेल्या अजिंक्य शिंदे यांनी पोलिसांनी जिथे अटक केली, त्यालाच जंतरमंतर समजा, असे म्हटल्याने पोलिस स्टेशनमध्येही गर्दी झाली आहे. ही धरपकड सुरू झाल्याने सरकारविरोधात संतापाची लाट उसळली आहे.

त्यातच आता दिल्लीच्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात जेन-झी, विद्यार्थी संघटना आणि विरोधी पक्षातील पदाधिकारीही उतरल्याचं पाहायला मिळत आहे. त्याच पार्श्वभूमीवर पोलिसांनी धरपकड सुरू केली असून बड्या नेत्यांना स्थानबद्ध केले आहे. एसआयआर रद्द करणे आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सीजेपीने



आज दिल्लीत आंदोलनाची हाक दिली होती तर काँग्रेससह इंडिया आघाडीच्या प्रमुख नेत्यांनीही कालच राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेऊन ज्ञानेश कुमारांविरुद्ध निवेदन दिले आहे. त्याच पार्श्वभूमीवर आज सीजेपीच्या आंदोलनात जेन-झीसह विद्यार्थी संघटनांचे पदाधिकारीही सहभागी झाल्याचे दिसून आले.

आम आदमी पक्षाचे नेते अरविंद केजरीवाल, तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी, युट्यूबर ध्रुव राठी ते सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपकेंसह अनेकांना दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतले. विशेष म्हणजे मुंबईतही महात्मा गांधींचे नातू तुषार गांधी यांना मुंबई पोलिसांनी ताब्यात घेतले असून डीएन नगर पोलिस ठाण्यात स्थानबद्ध करण्यात आले. दिल्ली पोलिसांनी ४ हजारांवर आंदोलकांना जेरबंद केल्याची माहिती आहे.

८ ते १२ ऑक्टोबरदरम्यान केंद्रीय सशस्त्र पोलिस दलाच्या २२१ कंपन्या म्हणजेच अंदाजे २३ हजार जवान तैनात करण्यात आले आहेत. या व्यतिरिक्त किमान १५ हजार दिल्ली पोलिस कर्मचारी तैनात आहेत. दिल्लीला जाणाऱ्या २५० रेल्वेगाड्या रद्द करण्यात आल्या. ४५ मेट्रो स्थानकांवरील प्रवेश आणि बाहेर पडण्याचे मार्ग बंद करण्यात आले. जंतरमंतरसमोर १० फूट उंचीचे बॅरिकेड्स उभारण्यात आले. अश्रुधूर वाहनेही तैनात करण्यात आली होती.

तुषार गांधी यांनी 'कॉकरोच जनता पार्टी'च्या आंदोलनाला पाठिंबा देत त्यांनी नागरिकांना मुंबईतील ऑगस्ट क्रांती मैदानावर एकत्र येण्याचे आवाहन केले होते. त्यामुळे मोठ्या संख्येने आंदोलक ऑगस्ट क्रांती मैदानाच्या दिशेने निघाले होते. परंतु मुंबईतही धरपकड सुरू झाली. तुषार गांधींसह अनेक सामाजिक कार्यकर्ते, युवकांना ताब्यात घेतले. तसेच बॉलिवूड अभिनेता इम्रान खानलाही ताब्यात घेतले. यासोबतच मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीही रस्त्यावर उतरली. यामुळे मोठा गोंधळ उडाला आहे. दरम्यान, आदित्य ठाकरे आणि संजय राऊतांनी तुषार गांधी यांना सोडवण्यासाठी ठिय्या आंदोलन केले. अखेर ८ तासांनंतर त्यांना सोडण्यात आले. राज्यात पुणे, नाशिक, नागपुरातही सीजेपीने आंदोलन केले.

### भारत अघोषित आणीबाणीत

भारत अघोषित आणीबाणीच्या स्थितीत आहे. काल जेव्हा मी आजच्या आंदोलनात एकता आणि शांतता राखण्याचे आवाहन करणारा संदेश पोस्ट केला. तेव्हा जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीत अघोषित आणीबाणी लागू असेल, अशी कल्पनाही मी केली नव्हती, या आंदोलनाचे नेतृत्व करण्यासाठी अनेक नेते पुढे आले, याचा मला आनंद होता; परंतु आता या सर्वांना अटक करण्यात आली आहे. जर उद्यापर्यंत त्यांची सुटका झाली नाही, तर मला उपोषण किंवा पदयात्रा काढावी लागेल, असा गर्भित इशारा सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूक यांनी दिला.

## 'एमपीएससी' आंदोलकांवर दुसरा गुन्हा दाखल

**पुणे | वीरभूमी** –

पुण्यातील अलका टॉकीज चौक आणि एस. एम. जोशी पुलावर स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांकडून सुरू असलेल्या बेमुदत आंदोलनावरून पोलिस प्रशासन आणि आंदोलनकर्त्यांमधील संघर्ष आता अधिक तीव्र बनला आहे. आंदोलनादरम्यान विनापरवाना ड्रोन उडवून चित्रीकरण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुण्यात सुरू असलेल्या एमपीएससी आंदोलनाचे चित्रीकरण करण्यासाठी आंदोलकांकडून तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत होता. मात्र, शहरात लागू असलेल्या सुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन केल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. पुण्यातील संवेदनशील भाग असलेल्या एस. एम. जोशी पूल आणि शास्त्री रोड परिसरात ड्रोन उडवण्यासाठी किंवा कोणत्याही प्रकारचे हवाई शूटिंग करण्यासाठी पुणे पोलिस आयुक्तालयाची कोणतीही अधिकृत पूर्वपरवानगी घेण्यात आलेली नव्हती. विनापरवाना ड्रोनचा वापर हा सुरक्षा नियमांचे थेट उल्लंघन ठरवून पोलिसांनी विश्रामबाग पोलिस ठाण्यात तातडीने गुन्हा दाखल केला. गुन्हा दाखल झालेल्या ५ जणांची नावे शिवराज मोरे (प्रदेशाध्यक्ष, युवक काँग्रेस), प्रमोद पाटील, दिगंबर खाडे, ऋषिकेश गांगुर्डे, अक्षय कांबळे अशी आहेत. पोलिसांनी या ड्रोन प्रकरणाचा स्वतंत्र तपास सुरू केला असून, ड्रोन कोणाच्या मालकीचे होते आणि ते कोणाच्या सांगण्यावरून वापरले गेले, याची पडताळणी पोलिस करत आहेत.

मात्र, प्रत्यक्ष वाटाघाटींनंतर कोणतीही पूर्वकल्पना न देता अचानक एस. एम. जोशी पुलावर पुन्हा रास्ता रोको करण्यात आला. सरकारच्या विरोधात प्रक्षोभक घोषणाबाजी करणे, बेकायदेशीर जमाव जमवणे आणि सार्वजनिक वाहतूक पूर्णपणे ठप्प केल्याचा ठपका आंदोलकांवर ठेवण्यात आला.

## अनुदानित वसतिगृहांतील ८१०४ कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप!

### विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची भीती | तुटपुंज्या मानधनाऐवजी वेतनश्रेणी लागू करण्याची मागणी

**अकोले | वीरभूमी** –

महाराष्ट्र राज्यातील अनुदानित वसतिगृहांमध्ये कार्यरत असलेल्या ८ हजार १०४ कर्मचाऱ्यांनी विविध मागण्यांसाठी सोमवार, दि. १९ ऑक्टोबर २०२६ पासून बेमुदत संप पुकारण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यातील २ हजार ३८८ अनुदानित वसतिगृहांमध्ये सुमारे एक लाख मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थी निवासी राहून शिक्षण घेतात. या संपामुळे विद्यार्थ्यांच्या दैनंदिन देखभालीसह शैक्षणिक व्यवस्थेवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. याच काळात विद्यार्थ्यांच्या प्रथम सत्राच्या परीक्षा सुरू असल्याने त्यांच्या शैक्षणिक नुकसानाची भीतीही व्यक्त केली जात आहे.

अनुदानित वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांची पालकांप्रमाणे काळजी घेण्यासाठी अधीक्षक, स्वयंपाकी, मदतनीस आणि चौकीदार असे चार कर्मचारी कार्यरत असतात. या कर्मचाऱ्यांना अत्यंत तुटपुंज्या मानधनावर २४ तास काम करावे लागत असल्याची त्यांची तक्रार आहे. सध्या अधीक्षकांना दरमहा १० हजार रुपये, स्वयंपाक्यांना ८ हजार ५०० रुपये, तर मदतनीस आणि चौकीदारांना प्रत्येकी ७ हजार ५०० रुपये मानधन मिळते. विद्यार्थ्यांची देखभाल, भोजनव्यवस्था आणि वसतिगृहाची सुरक्षा यांसारख्या जबाबदाऱ्या पार पाडूनही त्यांच्या वेतनाचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याचे कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे.

अनुदानित आश्रमशाळांना संलग्न असलेल्या वसतिगृहांतील कर्मचाऱ्यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन मंजूर करण्यात आले असताना, अनुदानित वसतिगृहांतील कर्मचाऱ्यांबाबत मात्र अन्याय होत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

वेतनवाढीच्या प्रतीक्षेत अनेक कर्मचारी निवृत्त झाले, तर काही कर्मचाऱ्यांनी आत्महत्या केल्याचा दावाही कर्मचाऱ्यांकडून करण्यात आला आहे. वेतनवाढीसाठी अनेक आंदोलने, मोर्चे आणि उपोषणे करूनही सरकारकडून अपेक्षित दखल घेतली जात नसल्याची नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

समाजकल्याण आयुक्त, पुणे यांनी वेतनश्रेणी लागू करण्यासंदर्भातील प्रस्ताव सादर केला होता. मात्र, सरकारने हा प्रस्ताव फेटाळून मागील आठवड्यात मंत्रिमंडळाच्या बैठकीत पुन्हा एकदा तुटपुंजी मानधनवाढ मंजूर केल्याचा आरोप संघटनेने केला आहे. हा निर्णय कर्मचाऱ्यांना मान्य नसल्याने त्यांनी बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतला आहे.

संपाच्या कालावधीत विद्यार्थ्यांच्या प्रथम सत्राच्या परीक्षा सुरू असल्याने त्यांच्या शैक्षणिक नुकसानाची सर्वस्वी जबाबदारी सरकारची राहील, असे कर्मचाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय झाल्याशिवाय संप मागे घेतला जाणार नाही, असे युनियनचे अध्यक्ष नागसेन पवार यांनी सांगितले. सरकार या संपाची दखल घेऊन कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर तोडगा काढणार का आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी कोणती पावले उचलणार, याकडे आता लक्ष लागले आहे.

# मुळा धरणाच्या आवर्तनात टेलच्या शेतकऱ्यांना पाणी नाही!

### मळेगाव, आव्हाने, सामनगाव परिसरातील पिके सुकण्याच्या मार्गावर | तातडीने पाणी न मिळाल्यास सोमवारी शेवगाव-नगर रस्त्यावर रास्ता रोकोचा इशारा

**शेवगाव | वीरभूमी** –

मुळा धरणाच्या उजव्या कालव्याचे आवर्तन सुरू होऊन तब्बल दीड ते दोन महिने उलटले, तरी मळेगाव, आव्हाने व सामनगाव परिसरातील वितरिकांना अद्याप पाणी मिळालेले नाही. त्यामुळे या भागातील शेतकरी मोठ्या संकटात सापडले असून, पाण्याअभावी उभी पिके जळू लागली आहेत. पाणीटंचाईमुळे पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. तातडीने पाणी न मिळाल्यास सोमवारी (ता. १२) शेवगाव-नगर रस्त्यावर रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा संतप्त शेतकऱ्यांनी दिला आहे.

मुळा धरणाच्या उजव्या कालव्याचे आवर्तन सुरू असतानाही टेलच्या भागातील शेतकऱ्यांना पाण्यापासून वंचित राहावे लागत आहे. वितरिका क्रमांक दोनला अद्याप पाणी सोडण्यात आले नसल्याने मळेगाव, आव्हाने व सामनगाव परिसरातील शेतकऱ्यांची अवस्था बिकट झाली आहे. पाण्याअभावी उभी पिके सुकू लागली असून, त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे.

शेतीसाठी पाणी उपलब्ध नसल्याने आगामी काळात जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे. कालव्याच्या पाणी वितरणासाठी 'टेल टू हेड' या नियमानुसार पाणी सोडणे अपेक्षित असताना संबंधित विभागाकडून या नियमाचे पालन होत नसल्याची शेतकऱ्यांची तक्रार आहे.



आवर्तन सुरू होऊन बराच कालावधी उलटला, तरी टेलच्या भागातील वितरिकेला पाणी मिळालेले नाही. त्यामुळे पाणी वितरणातील या प्रकारामुळे शेवटच्या टप्प्यातील शेतकऱ्यांवर अन्याय होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. पाणीटंचाईमुळे पिकांचे नुकसान टाळण्यासाठी वेळेत पाणी मिळणे आवश्यक असून, विलंब झाल्यास त्याची मोठी किंमत शेतकऱ्यांना मोजावी लागणार आहे. प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन वितरिकेला तातडीने पाणी सोडावे, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली. या गंभीर प्रश्नाबाबत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आ. मोनिका राजळे, जिल्हाधिकारी पंकज आशिया तसेच मुळा पाटबंधारे विभागाच्या मुख्य कार्यकारी अभियंता सायली पाटील यांनाही शेतकऱ्यांनी निवेदन दिले आहे. वितरिका क्रमांक दोनला तातडीने पाणी सोडून 'टेल टू हेड' या नियमानुसार प्रत्येक संस्थेला मंजूर कोट्याप्रमाणे पाणी देण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. पाणी वितरणातील असमानता दूर करून शेवटच्या टप्प्यातील शेतकऱ्यांनाही न्याय द्यावा, अशी मागणीही करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांच्या मागण्यांची तातडीने दखल घेऊन पाणी सोडण्याची कार्यवाही न झाल्यास सोमवारी (ता. १२) शेवगाव-नगर रस्त्यावर रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा भाजप युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष अण्णासाहेब ढोके, अनिल खैरे, सरपंच सुरज घोरपडे, संस्थेचे चेअरमन रमेश पंडित, दादासाहेब निकम, दीपक चौथे, सचिव घनश्याम फुंदे, सचिन निकम, संजय गायकवाड, विलास फुंदे, विठ्ठल आरेकर, वांढेकर सर, सुधाकर वायकर, बाबासाहेब कचरे, पांडुरंग अरोकर, कैलास फुंदे, आकाश वायकर, राधाकिसन फुंदे, असलम शेख, राहुल सातपुते आदींसह शेतकऱ्यांनी दिला आहे.

## SPOT NEWS



### शिष्यवृत्ती परीक्षा विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाचा पाया : मुकेश मुळे

**● शेवगाव । वीरभूमी–**
शिष्यवृत्ती परीक्षेत मिळालेले यश हे केवळ एका वर्गापुरते मर्यादित नसून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याचा आणि स्पर्धात्मक प्रवासाचा पाया आहे. वाढत्या स्पर्धेत टिकण्यासाठी विद्यार्थ्यांनी लहानपणापासूनच अशा परीक्षांना सामोरे जाणे गरजेचे आहे. शिष्यवृत्ती परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाचा पाया आहे, असे प्रतिपादन जिल्हा मराठा शिक्षण संस्थेचे सहसचिव मुकेश मुळे यांनी केले. शेवगाव येथील रेसिडेन्शिअल हायस्कूलमध्ये इयत्ता चौथी, पाचवी, सातवी व आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत, तसेच इयत्ता सहावी व सातवीच्या ज्ञानवर्धिनी परीक्षेत प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांच्या गुणगौरव समारंभात ते बोलत होते. यावेळी ॲड. वसंत कापरे, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य अंकुश शिंदे, बळीराम लव्हाट, सतीश लांडे, विद्यालयाचे प्राचार्य बालाजी गायकवाड, उपमुख्याध्यापक राजेंद्र आदमाने, पर्यवेक्षक महेश शिंदे आदी उपस्थित होते. ॲड. वसंत कापरे म्हणाले की, विद्यालयाची शैक्षणिक प्रगती दर्जेदार आणि कौतुकास्पद आहे. नियमित अभ्यासक्रमासोबतच शिष्यवृत्तीसारख्या स्पर्धात्मक परीक्षांमध्येही विद्यालय दरवर्षी आपली कामगिरी सिद्ध करत आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यालयाने घेतलेल्या परिश्रमांचे फलित निकालातून दिसून येत असल्याचे त्यांनी सांगितले. या वेळी शिष्यवृत्ती परीक्षा, ज्ञानवर्धिनी परीक्षा, डॉ. सी. व्ही. रमण परीक्षा, दहावी परीक्षा, हिंदी राष्ट्रभाषा परीक्षा तसेच इतर विविध स्पर्धात्मक परीक्षांमध्ये प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचा गुणगौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य बालाजी गायकवाड यांनी केले. बाळासाहेब गव्हाळ यांनी सूत्रसंचालन केले, तर संजय देवढे यांनी आभार मानले.

### निवासी जागेचा प्रश्न; न्यायासाठी नंदू पारखे यांचा आमरण उपोषणाचा इशारा

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
पिंपरी निर्मळ येथील निवासी जागेचा प्रश्न मार्गी लावून न्याय मिळावा, तसेच अमरधामच्या विस्तारासाठी ताब्यात घेतलेली जागा तत्काळ मोकळी करावी, या मागणीसाठी नंदू पोपट पारखे यांनी तहसीलदार, राहाता यांना निवेदन देत २१ ऑक्टोबर रोजी तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. निवेदनात पारखे यांनी म्हटले आहे की, ते पिंपरी निर्मळ गावचे कायमस्वरूपी रहिवासी असून ग्रामपंचायत हद्दीतील शासकीय गट क्रमांक ३२७ मध्ये त्यांच्या कुटुंबाच्या मिळकतींची ग्रामपंचायत दप्तरी नोंद आहे. लक्ष्मीबाई सर्जन पारखे यांच्या नावावर मिळकत क्र. १३६६, चंदू पोपट पारखे यांच्या नावावर १३८७ तर नंदू पोपट पारखे यांच्या नावावर १४९० अशी नोंद असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. गेल्या सुमारे ३५ वर्षांपासून या जागेवर वास्तव्य असून २००७ पासून संबंधित जागेचा नियमित कर भरत असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

# चार लाख लिटर पाणी मंजूर, प्रत्यक्ष पुरवठा अडीच लाख लिटरच!

**ठेकेदाराच्या मनमानीमुळे नगरपंचायत अडचणीत । सुपा एमआयडीसीतून पाणी भरण्याची नगराध्यक्षांची मागणी**

**● पारनेर । वीरभूमी –**
पारनेर शहरातील पाणीटंचाईचे संकट दिवसेंदिवस गंभीर होत असताना, दररोज चार लाख लिटर पाणीपुरवठ्यासाठी मंजूर खेपा असूनही प्रत्यक्षात केवळ अडीच लाख लिटर पाण्याचाच पुरवठा होत असल्याची तक्रार समोर आली आहे. त्यामुळे नागरिकांना पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध करून देताना पारनेर नगरपंचायत प्रशासनाची मोठी अडचण होत आहे. मंजूर पाणीपुरवठा आणि प्रत्यक्ष होणारा पुरवठा यातील तफावतीमुळे नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे.

शहरातील नागरिकांची पिण्याच्या पाण्याची गरज भागवण्यासाठी नगरपंचायतीमार्फत टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. यासाठी दररोज चार लाख लिटर पाणीपुरवठ्याच्या खेपा मंजूर असल्याचे सांगण्यात येते. मात्र, संबंधित ठेकेदाराकडून प्रत्यक्षात केवळ अडीच लाख लिटर पाणी पुरवले जात असल्याचा आरोप होत आहे. परिणामी, शहरातील सर्व भागांत नियमित आणि पुरेशा प्रमाणात पाणी पोहोचवणे नगरपंचायतीसमोर आव्हान ठरत आहे.

मंजूर खेपांनुसार पाणीपुरवठा होत नसल्याने नगरपंचायत प्रशासन, नगराध्यक्षा आणि पाणीपुरवठा सभापती यांच्या सूचनांकडे संबंधित ठेकेदार दुर्लक्ष करत असल्याची तक्रार आहे. ठेकेदाराकडून अपेक्षित पाणीपुरवठा होत नसल्यास त्यामागील कारणांची तपासणी करून आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.



पिण्याच्या पाण्यासारख्या अत्यावश्यक सुविधेच्या बाबतीत होणाऱ्या दिरंगाईमुळे नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

शहरातील पाणीटंचाईवर तातडीने उपाययोजना करण्यासाठी पारनेर नगरपंचायतीच्या टँकरना सुपा औद्योगिक वसाहतीतून (एमआयडीसी) पाणी भरण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी नगराध्यक्षा डॉ. विद्या कावरे यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

सुपा एमआयडीसी परिसरात टँकरसाठी स्वतंत्र पाणी भरण्याचे ठिकाण निश्चित करावे. तसेच पाणीटंचाईच्या काळात नगरपंचायतीच्या टँकरना नियमितपणे आणि प्राधान्याने पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी विनंती त्यांनी केली आहे. यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक आदेश देऊन तातडीने कार्यवाही करण्याची मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.

**चार लाख लिटर पाणी मिळाल्यास पुरवठा सुरळीत होईल**

■ शहरासाठी दररोज चार लाख लिटर पाणीपुरवठा झाल्यास नागरिकांना पाणी उपलब्ध करून देणे अधिक सोयीचे होईल आणि पाणीपुरवठा सुरळीत होण्यास मदत होईल.

– **योगेश मते**, सभापती, पाणीपुरवठा विभाग, पारनेर नगरपंचायत

सुपा एमआयडीसीतून पाणी उपलब्ध झाल्यास टँकरद्वारे पाणीपुरवठा अधिक सुरळीत होण्यास मदत होईल आणि नागरिकांना दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. या निवेदनाची प्रत माहितीसाठी जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांना, तर पुढील कार्यवाहीसाठी पारनेर नगरपंचायतीच्या मुख्याधिकाऱ्यांना देण्यात आली आहे.

**पुरवठा सुरळीत न झाल्यास ठेकेदारावर गुन्हा दाखल करणार**

■ चार लाख लिटर पाणीपुरवठा करण्यासाठी ठेकेदाराने एक दिवसाची मुदत मागितली आहे. मात्र, टँकरद्वारे सुरळीत पाणीपुरवठा न केल्यास प्रांताधिकाऱ्यांच्या आदेशानुसार संबंधित ठेकेदारावर तातडीने गुन्हा दाखल करण्यात येईल.

– **प्रियांका शिंदे**, मुख्याधिकारी, नगरपंचायत पारनेर

**मुजोर ठेकेदार फक्त अडीच लाख लिटर पाणी देतोय**

■ मंजूर चार लाख लिटर पाणीपुरवठा झाल्यास शहरात पाण्याची समस्या निर्माण होणार नाही. मात्र, ठेकेदार केवळ अडीच लाख लिटर पाणीपुरवठा करत आहे. अनेकदा सांगूनही ठेकेदार नगरपंचायत प्रशासनाचे ऐकत नाही.

– **डॉ. विद्या कावरे**, नगराध्यक्षा, पारनेर नगरपंचायत

मंजूर चार लाख लिटर पाण्याच्या तुलनेत प्रत्यक्ष पुरवठा कमी होत असल्याच्या तक्रारींची प्रशासनाकडून कशी दखल घेतली जाते, संबंधित ठेकेदारावर काय कारवाई होते आणि सुपा एमआयडीसीतून पाणी भरण्याची परवानगी मिळते का, याकडे पारनेरकरांचे लक्ष लागले आहे.

## विजय भालसिंग यांचा गोवा सोशल एक्सलन्स अवॉर्डने गौरव

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक तसेच निसर्ग व पर्यावरण क्षेत्रात गेल्या दोन दशकांपासून निस्वार्थपणे कार्य करणारे वाळकी (ता. अहिल्यानगर) येथील सामाजिक कार्यकर्ते विजय भालसिंग यांना स्वर कला संघ, गोवा आणि समाज कल्याण संचालनालय, गोवा सरकार यांच्या वतीने 'गोवा सोशल एक्सलन्स अवॉर्ड २०२६' ने गौरविण्यात आले. त्यांच्या सातत्यपूर्ण सामाजिक व पर्यावरणपूरक कार्याची दखल घेत हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला.

पणजी येथे आयोजित करण्यात आलेल्या 'गोवा सोशल एक्सलन्स अँड इम्पॅक्ट समिट २०२६' मध्ये मान्यवरांच्या हस्ते भालसिंग यांचा गौरव करण्यात आला. 'सेवेपासून सामाजिक परिवर्तनापर्यंत' हे ब्रीदवाक्य घेऊन या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक कार्याच्या माध्यमातून समाजाला सकारात्मक दिशा देणाऱ्या व्यक्तींच्या कार्याचा गौरव या सोहळ्यात करण्यात आला. या कार्यक्रमास आमदार तथा गोव्याचे माजी कला, क्रीडा व संस्कृती मंत्री गोविंद गावडे, आमदार प्रेमेंद शेटे तसेच अभिनेत्री श्रुती पारकर, संस्थेचे अध्यक्ष निहाल सावंत, स्वागताध्यक्ष प्रा.डॉ. बी.एन. खरात उपस्थित होते.

विजय भालसिंग हे गेल्या दोन दशकांपासून विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रियपणे योगदान देत आहेत. वाळकी येथील रहिवासी असलेले भालसिंग एसटी बँकेची नोकरी सांभाळत सामाजिक कार्यासाठी वेळ देत आहेत.

## पावसाअभावी श्रीगोंद्यात बैलपोळा साधेपणाने

**पशुधन वाचविण्यासाठी तातडीने अनुदान द्या; नाना शिंदे यांची मागणी**

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**
श्रीगोंदा तालुक्यात पावसाने पाठ फिरवल्याने दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. चारा आणि पाण्याच्या टंचाईमुळे शेतकऱ्यांसमोर पशुधन जगविण्याचे मोठे संकट उभे राहिले असून, यंदाचा बैलपोळा सणही साध्या पद्धतीने साजरा करण्यात आला. शासनाने तातडीने पशुगणना करून पशुधनाच्या संगोपनासाठी शेतकऱ्यांच्या खात्यावर थेट अनुदान जमा करावे, अशी मागणी संभाजी ब्रिगेडचे जिल्हा उपाध्यक्ष नाना शिंदे यांनी केली आहे.



राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे शेतीबरोबरच पशुधनाचे अस्तित्वही धोक्यात आले आहे. जनावरांना पुरेसा चारा आणि पाणी उपलब्ध होत नसल्याने शेतकरी हतबल झाले आहेत. आगामी काळात ही टंचाई अधिक तीव्र झाल्यास पशुधन वाचविणे कठीण होईल, अशी भीती शेतकऱ्यांमधून व्यक्त होत आहे.

शेतकऱ्यांचे पशुधन हे शेतीचा महत्त्वाचा आधार आहे. त्यामुळे शासनाने तातडीने पशुगणना करून प्रत्येक पशुपालक शेतकऱ्याला थेट खात्यावर अनुदान द्यावे. या मदतीमुळे जनावरांच्या चारा-पाण्याची व्यवस्था करण्यास हातभार लागेल आणि पशुधनाचे संरक्षण करता येईल. शासनाने वेळीच ठोस पावले उचलली नाहीत, तर पशुधनाचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे, असे नाना शिंदे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

# एकल महिलांना आधार देण्यात साऊ एकल महिला समितीची भूमिका महत्त्वाची

**आमदार डॉ. किरण लहामटे । अकोलेत साऊ एकल महिला समितीच्या नवीन कार्यालयाचे उद्घाटन**

**● अकोले । वीरभूमी–**
केवळ अकोले तालुक्यातच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रात एकल महिलांना आधार देण्याचे महत्त्वपूर्ण काम साऊ एकल महिला समिती करत आहे. महिलांना केवळ शासकीय योजनांचा लाभ मिळवून न देता त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून स्वतःच्या पायावर उभे करण्याचे समितीचे कार्य कौतुकास्पद आहे, असे गौरवोद्गार आमदार डॉ. किरण लहामटे यांनी काढले.

अकोले तालुका साऊ एकल महिला समितीच्या शनी मंदिरामागील लक्ष्मी हाउसिंग सोसायटीमध्ये सुरू करण्यात आलेल्या नवीन कार्यालयाचे उद्घाटन आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.

आमदार डॉ. लहामटे म्हणाले की, कोरोनाच्या काळापासून एकल महिलांच्या अडचणी आणि दुःख आपण सर्वजण अनुभवत आहोत. या महिलांना आर्थिक आधाराबरोबरच भावनिक आधार, समाजात सन्मान व सुरक्षितता तसेच कुटुंबात समान वागणूक मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी साऊ एकल महिला समितीचे काम महत्त्वाचे असून, लोकप्रतिनिधी म्हणून आपण सदैव त्यांच्या पाठीशी उभे राहू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

साऊ एकल महिला समितीच्या तालुका निमंत्रक प्रतिमा कुलकर्णी यांनी प्रास्ताविकात समितीने आजपर्यंत केलेल्या कार्याची माहिती दिली. सध्या सुमारे १ हजार एकल महिला समितीच्या संपर्कात असून, आतापर्यंत एकल महिलांचे ४८ व्यवसाय सुरू करण्यात आले आहेत. यावर्षी १०० व्यवसाय सुरू करण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.

साऊ समितीचे राज्य निमंत्रक हेरंब कुलकर्णी यांनी संपूर्ण राज्यात सुरू असलेल्या समितीच्या कार्याची माहिती दिली. राज्यातील ३२ जिल्ह्यांतील १२० तालुक्यांमध्ये समितीचे काम पोहोचले असून, समितीच्या प्रयत्नातून ३२ जिल्ह्यांत एकल महिलांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे.

राज्य शासनाने एकल महिलांसाठी स्वतंत्र धोरण जाहीर करण्याची भूमिका घेतली असून, महाराष्ट्र हे भारतातील पहिले राज्य ठरणार असल्याबद्दल त्यांनी शासनाचे आभार मानले. एकल महिलांसाठी धोरणात्मक बदल घडवून आणण्यासाठी साऊ एकल महिला समिती राज्यस्तरावर करत असलेल्या प्रयत्नांची माहितीही कुलकर्णी यांनी दिली.

भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते जालिंदर वाकचौरे यांनी एकल महिलांसाठी सुरू असलेले काम हे महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा वारसा पुढे नेणारे असल्याचे सांगितले. साऊ समितीच्या आजपर्यंतच्या कार्यप्रवासाचे आपण साक्षीदार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

अभिनव शिक्षण संस्था व बुवासाहेब नवले पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन मधुकरराव नवले यांनी कुलकर्णी दाम्पत्याच्या कार्याचे कौतुक केले. अशा ध्येयवादातून सामाजिक कामे उभी राहतात आणि त्यासाठी धोरणात्मक पाठपुरावा महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले.



अकोले तालुका पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष भाऊपाटील नवले यांनी तालुक्यातील सर्व पतसंस्था एकल महिलांच्या रोजगारासाठी त्यांच्या पाठीशी उभ्या राहतील, अशी ग्वाही दिली. जिल्हा बालकल्याण समितीच्या सदस्य ॲड. अनुराधा येवले यांनीही कार्यक्रमाला उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.

यावेळी अर्थवेद पतसंस्थेचे चेअरमन बबनराव महाले, दूधगंगा पतसंस्थेचे चेअरमन डॉ. नितीन चासकर, ज्येष्ठ पत्रकार प्रकाश टाकळकर, डॉ. संदीप कडलग, शिवसेनेचे तालुकाध्यक्ष सुशांत गजे, डॉ. अशोक भांगरे, डॉ. प्रतीक भांगरे, चंद्रकांत सरोदे, अरुण रुपवते, शांताराम संगारे, माजी प्राचार्य अयाज शेख, संतोष कचरे, साहित्यिक डॉ. सुनील शिंदे, हिंद सेवा मंडळाचे कार्यकारिणी सदस्य दिलीप शहा, सरपंच रवी मालुंजकर, खंडुबाबा वाकचौरे, नीता आवारी, विमल मुंडे, नगरसेविका प्रतिभा मनकर, शितल वैद्य, श्वेताली रुपवते, जनाबाई मोहिते, डॉ. जनार्दन मोरे, नवनाथ नेहे, अक्षय आभाळे, हरीभाऊ फापाळे, आरिफ शेख, उबेद शेख, अनिल कोळपकर, बाळासाहेब भोर, हेमंत दराडे, उमेद अभियानचे कुंदन कोरडे, संदीप शिंदे, अरुण हर नामें आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत व सूत्रसंचालन अमोल वैद्य यांनी केले. राष्ट्रवादी किसान सभेचे प्रांताध्यक्ष ॲड. वसंतराव मनकर यांनी आभार मानले.

SPOT NEWS

## नवरात्र उत्सवानिमित्त शहरात १५ ऑक्टोबरला दांडिया नाईटचे आयोजन

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

शारदीय नवरात्र उत्सवानिमित्त शहरातील जिव्हाळा ग्रुप आयोजित व महावीर ग्रुप प्रायोजित दांडिया नाईटचे गुरुवारी (दि.१५ ऑक्टोबर) संध्याकाळी टिळकरोड येथील नंदनवन लॉन येथे आयोजन करण्यात आले आहे. या दांडिया नाईटमध्ये सहभागी होण्याचे आवाहन जिव्हाळा ग्रुपच्या अध्यक्षा अल्पना कासवा व सविता काळे यांनी केले आहे. महिलांनी एकत्र येऊन जिव्हाळा ग्रुपची मुहुर्तमेढ रोवली असून, या ग्रुपच्या माध्यमातून विविध सामाजिक व धार्मिक उपक्रम राबविण्यात येत आहे. तर विविध सण-उत्सवात महिलांना एक व्यासपीठ निर्माण करुन देण्यासाठी ग्रुपचे कार्य सुरु आहे. या ग्रुपमध्ये जिल्ह्यातील विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिला जोडल्या गेल्या आहेत. या दांडिया नाईटच्या कार्यक्रमात नवरात्रीनिमित्त विविध स्पर्धा रंगणार असल्याची माहिती अल्पना कासवा यांनी दिली. यामध्ये बेस्ट सोलो डान्सर, बेस्ट कपल डान्स, बेस्ट ड्रेसअप, बेस्ट ग्रुप डान्स, बेस्ट किड्स डान्सरचे आकर्षक बक्षिस देण्यात येणार आहे. तर मिस व मिस्टर जिव्हाळा हे विशेष पुरस्कार यावर्षी ठेवण्यात आले आहे. या दांडिया नाईटचे वैशिष्टये म्हणजे नॉन स्टॉप म्युझिक लाईट, डीजे, एलईडी वॉल स्टेज आणि फूड काउंटर्स राहणार आहे. तसेच भाग्यवान विजेत्यांना कुपनच्या लकी ड्रॉ द्वारे बक्षिसे, महिलांना पैठणी साडीसह सोने व चांदीचे बक्षीस दिले जाणार आहे. या कार्यक्रमासाठी बजरंग काशीनाथ गुरव, सरस्वती हॉस्पिटल, नॉव एण्ड फॉरेव्हर फोटोग्रॉफी ॲण्ड फिल्म, उडाण डिजायनिंग लाईफ यांचे विशेष सहकार्य लाभले असून, पराईज ट्योटोरील्स, ट्रेक कॅम्प आणि सुख योगा असोसिएट्स पार्टनर आहेत.

## न्यू आर्ट्स महाविद्यालयात आनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांची ८० हजारांहून अधिक उलाढाल

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

शिक्षणासोबतच व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करणे, कल्पकतेला वाव देणे आणि स्वावलंबनाची जाणीव निर्माण करणे या उद्देशाने न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कनिष्ठ महाविद्यालयात कला शाखा व एच.एस.एस.सी. व्होकेशनल विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला आनंद मेळा व फनफेअर उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या विविध खाद्यपदार्थांची विक्री करत आपल्या व्यावसायिक कौशल्यांचे दर्शन घडविले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी तब्बल ८० हजार रुपयांहून अधिकची उलाढाल केली. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे महाविद्यालयाच्या प्रांगणात आनंदमय वातावरण निर्माण झाले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांच्या हस्ते आनंद मेळा व फनफेअरचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रा. कल्पना दारकुंडे, पर्यवेक्षक प्रा. सुभाष गोरे, प्रा. राजेंद्र जाधव, प्रा. प्राजक्ता भंडारी, प्रा. रंजना डिके, प्रा. कल्याण मुरकुटे, प्रा. किरण वाघमोडे, प्रा. संजय जाजगे, प्रा. चंद्रकांत फसले, प्रा. नितीन पानसरे, प्रा बाबासाहेब आडसुळ, प्रा. प्रमिला तांबे, प्रा. दत्तात्रय आहेर, प्रा. अनिता चव्हाण, प्रा. गणेश भगत, प्रा. संजय अकोलकर यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आनंद मेळ्यात विद्यार्थ्यांनी स्वतःच्या कल्पकतेतून २५ ते ३० स्टॉल्स उभारले होते. या स्टॉल्सवर ज्यूस, केक, कुल्फी, विविध स्नॅक्स, भेळ, इडली, चहा, पाणीपुरी, समोसे, इडली-सांबार, पापडभाजी, वडापाव यांसह विविध गोडधोड पदार्थांची विक्री करण्यात आली. याशिवाय जीवनोपयोगी वस्तूंचे स्टॉल्सही आकर्षणाचे केंद्र ठरले.

# कोतूळमध्ये भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट; बंदोबस्ताची मागणी

**मटणाचे अवशेष उघड्यावर टाकल्याने कुत्र्यांची संख्या वाढल्याचा आरोप । सकाळी फिरणाऱ्या नागरिकांनाही त्रास**

**● अकोले । वीरभूमी–**

कोतूळ गावातील विविध भागांत भटक्या कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने ग्रामस्थांसह सकाळी फिरण्यासाठी घराबाहेर पडणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रस्ते, गल्लीबोळ, बाजारपेठ तसेच रहिवासी परिसरात कुत्र्यांचे टोळके फिरत असल्याने त्यांचा तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.



गावातील काही मटण विक्रेते शिल्लक राहिलेले मांसाचे तुकडे व अन्य अवशेष उघड्यावर टाकत असल्याने त्या ठिकाणी भटक्या कुत्र्यांची गर्दी होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. मांसाचे अवशेष उघड्यावर टाकल्याने परिसरात अस्वच्छता निर्माण होऊन दुर्गंधी तसेच रोगराई पसरण्याची शक्यता असल्याची चिंता नागरिकांनी व्यक्त केली आहे.

विशेषतः सकाळच्या वेळेस अनेक नागरिक आरोग्यासाठी फिरण्यासाठी घराबाहेर पडतात. मात्र, रस्त्यांवर मोठ्या संख्येने भटक्या कुत्र्यांची टोळकी फिरत असल्याने नागरिकांना त्यांचा सामना करावा लागत आहे. कुत्र्यांच्या भीतीमुळे सकाळी फिरण्यासाठी बाहेर पडणाऱ्या नागरिकांचे प्रमाणही कमी झाल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच दुचाकीस्वारांना या कुत्र्यांचा अधिक त्रास होत आहे. कुत्र्यांच्या टोळक्यांमुळे दुचाकीस्वारांच्या अपघाताची शक्यताही निर्माण झाली आहे. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला असून, ग्रामपंचायत प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी करण्यात आली आहे.

भटक्या कुत्र्यांचा मानवीय पद्धतीने बंदोबस्त करण्याबरोबरच त्यांचे निर्बीजकरण व लसीकरण करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच सार्वजनिक ठिकाणी मटणाचे अवशेष अथवा कचरा उघड्यावर टाकणाऱ्यांवर आवश्यक ती कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

मटण विक्रेत्यांना मांसाचे अवशेष योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्याबाबत सूचना देण्यात याव्यात, जेणेकरून सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता निर्माण होणार नाही आणि भटक्या कुत्र्यांच्या संख्येवर नियंत्रण ठेवण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

याबाबत विजय काळे, ऋषिकेश नागरे, किरण सोनुले आणि गिरीष कोते यांनी ग्रामपंचायत प्रशासनाकडे निवेदन देऊन भटक्या कुत्र्यांचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची मागणी केली आहे.

नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ग्रामपंचायतीने संबंधित यंत्रणेशी समन्वय साधून भटक्या कुत्र्यांचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

## श्रीगोंदा तालुका पॅथॉलॉजी लॅब असोसिएशनची कार्यकारिणी बिनविरोध

**अध्यक्षपदी सागर कोथिंबीरे, तर सचिवपदी सुनील क्षीरसागर**



**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

आरोग्यसेवा क्षेत्रात पॅथॉलॉजी लॅबचे महत्त्व लक्षात घेऊन श्रीगोंदा तालुक्यातील ६२ लॅबचालक एकत्र आले. त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी आणि संघटितपणे काम करण्याच्या उद्देशाने गुरुवार दि. ८ रोजी हॉटेल अनन्या येथे श्रीगोंदा तालुका पॅथॉलॉजी लॅब असोसिएशनची कार्यकारिणी स्थापन करण्यात आली.

या कार्यकारिणीची निवड सर्वानुमते बिनविरोध करण्यात आली. संघटनेच्या तालुकाध्यक्षपदी सागर कोथिंबीरे, उपाध्यक्षपदी नंदू गायकवाड व पूनम नलगे, सचिवपदी सुनील क्षीरसागर, तर खजिनदारपदी सुरेश बडवे यांची निवड झाली.

आरोग्यसेवा क्षेत्रात काम करताना लॅबचालकांना विविध अडचणींचा सामना करावा लागतो. या अडचणींवर सामूहिकरीत्या उपाययोजना करणे, परस्पर समन्वय वाढविणे आणि संघटितपणे प्रश्न सोडविणे, हा संघटना स्थापनेमागील प्रमुख उद्देश आहे. या वेळी श्री.पिसे, श्री. धनक, श्री.घोडेकर, संध्या नलगे, सौ. शितोळे आणि संजय गंगाधरे यांच्यासह ज्येष्ठ मार्गदर्शकांचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कोथिंबीरे यांनी केले, तर सुधाकर हिरवे यांनी आभार मानले. यावेळी श्रीगोंदा तालुक्यातील लॅब असोसिएशनचे सदस्य उपस्थित होते.

## पिंटो ग्रंथालयाच्या वतीने नवरात्रोत्सवात 'वाचनशक्तीचा जागर'!

**उत्कृष्ट पुस्तक अभिप्राय देणाऱ्या महिलांना मानाच्या पैठणीचा सन्मान**

**● निघोज । वीरभूमी–**

नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून पिंटो ग्रंथालय, पाडळी आळे (ता. पारनेर) यांच्या वतीने वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी 'वाचनशक्तीचा जागर' हा अभिनव उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत 'पुस्तकावर वाचक अभिप्राय स्पर्धा' घेण्यात येणार असून, उत्कृष्ट अभिप्राय देणाऱ्या महिला वाचकांना मानाच्या पैठणीसह विविध आकर्षक बक्षिसे देऊन गौरविण्यात येणार आहे.



हा विशेष उपक्रम दि. ११ ते १९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत दररोज सकाळी ९ ते १० या वेळेत पिंटो ग्रंथालय, पाडळी आळे येथे होणार आहे. नवरात्रोत्सवाच्या नऊ दिवसांत नऊ वेगवेगळ्या वाडीवस्त्यांवरील महिलांना या उपक्रमात सहभागी होण्यासाठी विशेष निमंत्रित करण्यात आले आहे. नवरात्रीत शक्तीची उपासना करतानाच ज्ञानशक्ती आणि वाचनशक्तीचा जागर करण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे. ही स्पर्धा सर्व महिला वाचकांसाठी खुली आहे.

स्पर्धेत सहभागी महिलांना त्यांनी वाचलेल्या कोणत्याही मराठी पुस्तकावर अभिप्राय लिहिता येणार आहे. यामध्ये कथा, कादंबरी, आत्मचरित्र, वैचारिक साहित्य, इतिहास आदी विषयांवरील पुस्तकांचा समावेश असेल. उत्कृष्ट अभिप्राय देणाऱ्या महिलांसाठी विविध बक्षिसांचे नियोजन करण्यात आले आहे.

**दोन मानाच्या पैठण्या :** आदिशक्ती नवरात्रीचा मान आणि क्रांतीज्योत सावित्रीचा वाण म्हणून दोन मानाच्या पैठण्यांनी महिलांचा गौरव करण्यात येणार आहे.

**नऊ मानाच्या साड्या :** नवरात्रोत्सवाच्या नऊ दिवसांसाठी नऊ मानाच्या साड्या देण्यात येणार आहेत. यासाठी पाडळी आळेच्या सरपंच सौ. कविता विकास डेरे, सौ. साधना अशोक डेरे (सीआरपी) आणि सौ. उज्वला सुखदेव डेरे यांचे सौजन्य लाभले आहे.

**नऊ चांदीच्या महालक्ष्मी मूर्ती :** साईराज कलेक्शन, आळकुटी आणि सौ. रश्मी सचिनशेठ साखला यांच्या वतीने नऊ चांदीच्या महालक्ष्मी मूर्ती देण्यात येणार आहेत.

**सन्मानचिन्हे :** स्पर्धेत प्रथम ते पाचव्या क्रमांकापर्यंत यश मिळवणाऱ्या महिलांना कै. दत्तात्रेय गावडे यांच्या स्मरणार्थ सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे.

या उपक्रमादरम्यान महिलांसाठी हळदीकुंकू समारंभाचेही आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे सौजन्य सौ. रजनी उत्तम थोरात यांनी स्वीकारले आहे. स्पर्धेतील विजेत्या महिलांचा पारितोषिक वितरण समारंभ सोमवार, दि. १९ ऑक्टोबर २०२६ रोजी होणार आहे. या उपक्रमाचे संयोजन श्री संगमेश्वर महिला ग्राम संघ, विविध संस्थांमधील महिला पदाधिकारी, पिंटो ग्रंथालय कार्यवाहक समिती आणि पाडळी आळे येथील महिला भगिनी यांच्या वतीने करण्यात येत आहे. परिसरातील जास्तीत जास्त महिलांनी या ज्ञानवर्धक उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# महात्मा गांधींच्या ग्रामस्वच्छता व ग्रामस्वराज्याच्या विचारांतून गावे स्वावलंबी होतील

**ॲड. शिवाजीराव काकडे । कोळसांगवी येथे गांधी ग्रामस्वच्छता अभियानाचा बक्षीस वितरण सोहळा**

**● पाथर्डी । वीरभूमी–**

प्रत्येक गावाने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या ग्रामस्वराज्य आणि ग्रामस्वच्छतेच्या संकल्पनेतून प्रेरणा घेऊन ग्रामविकास साधल्यास गावे स्वावलंबी व परिपूर्ण होतील, असे प्रतिपादन ॲड. शिवाजीराव काकडे यांनी केले.

महात्मा गांधी यांच्या १५७ व्या जयंतीनिमित्त कोळसांगवी येथे आयोजित 'गांधी ग्रामस्वच्छता अभियान' बक्षीस व पारितोषिक वितरण समारंभात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

मार्गदर्शन करताना ॲड. काकडे यांनी वैयक्तिक आणि सामूहिक स्वच्छतेचे महत्त्व विशद केले. महात्मा गांधी यांचे सत्य, अहिंसा, अपरिग्रह आणि सत्याग्रह हे विचार तसेच 'खेड्याकडे चला' ही संकल्पना त्यांनी ग्रामस्थ आणि शालेय विद्यार्थ्यांसमोर मांडली.



या वेळी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे प्रदेश सरचिटणीस ॲड. सुभाष लांडे यांनी महात्मा गांधी आणि विनोबा भावे यांच्या विचारांमधील 'सक्षम व आत्मनिर्भर गावे' या विषयावर सखोल विवेचन केले. प्रा. प्रमोद दौंड, हुमायून अत्तार आणि वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष पप्पू बोर्डे यांनीही मनोगत व्यक्त केले.

उपस्थित मान्यवरांच्या हस्ते कोळसांगवी जिल्हा परिषद शाळेला पाच हजार रुपये रोख रक्कम, प्रशस्तीपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. तसेच स्थानिक ग्रामपंचायत कार्यालयालाही प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

या वेळी ज्येष्ठ अभिनेते व सामाजिक कार्यकर्ते नाना पाटेकर यांच्या निधनाबद्दल भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या सोहळ्यास बशीर शेख, आजीनाथ धनवडे, रणजित गाडे, आदेश साळवे, गणेश धनवडे, काटकर सर, पुष्पा फुंदे, रामदास साळवे, श्रीधर घुले, हुमायून अत्तार, दत्ता कुसळकर, दादा घुले, गोकुळ घुले, अलिम शेख, शाहनवाज शेख, पांडुरंग जाधव, जगन्नाथ धनवडे, अशोक गोरे, अतुल घुले आणि विजय कुसळकर यांच्यासह जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजीव फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा गांधी ग्लोबल फॅमिलीचे सदस्य सलीम शेख यांनी केले. युवराज फुंदे यांनी सूत्रसंचालन केले, तर अरविंद सोनटक्के यांनी आभार मानले.

## नगरमध्ये भाजपा अनुसूचित जाती मोर्चाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक उत्साहात

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

शहरात भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती मोर्चा महाराष्ट्र प्रदेश प्रमुख पदाधिकारी बैठक उत्साहात पार पडली. भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष विश्वजीत गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या महत्त्वपूर्ण बैठकीत अनुसूचित जाती मोर्चाचे राज्यातील पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीत पक्षाची आगामी वाटचाल, ग्रामीण भागातील जनतेचे प्रश्न आणि केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून दलित समाजासाठी राबविण्यात आलेल्या विविध जनहितकारी निर्णयांवर सविस्तर चर्चा करत आगामी उपाययोजनांचे नियोजन करण्यात आले.

लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय येथे झालेल्या या एकदिवसीय बैठकीची सुरुवात सकाळी दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी सुधीर जांभूळकर यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना मांडली. यानंतर पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांचे व्हर्च्युअल (दूरदृश्य) प्रणालीद्वारे मार्गदर्शनपर भाषण झाले. सर्व पाहुण्यांचे स्वागत बैठकीचे आयोजक तथा भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे राज्य उपाध्यक्ष मनेष साठे यांनी केले.

दुपारच्या दुसऱ्या सत्रात पक्षाच्या प्रमुख महामंत्र्यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. यामध्ये महामंत्री परिमलजी कांबळे यांनी संघटनात्मक जबाबदारी आणि कर्तव्ये' यावर मार्गदर्शन केले, तर महामंत्री राहुल कांबळे यांनी चळवळ आणि पक्षीय मूल्ये यावर सखोल माहिती दिली.

पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील 'ग्राऊंड लेव्हल'चे विषय समजून घेऊन, त्यावर प्रभावी उपाययोजना राबविण्यावर या बैठकीत भर देण्यात आला.

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# अकोल्याच्या पाण्याच्या हक्कासाठी ठाकरे शिवसेनेचा तहसील कार्यालयावर मोर्चा

**धरणांतील पाण्याचे योग्य नियोजन करण्याची मागणी । निळवंडेतून सुरू असलेले आवर्तन, पाण्याची उधळपट्टी थांबविण्याची निवेदनातून मागणी**

**● अकोले । वीरभूमी –**
संपूर्ण राज्यात दुष्काळाची छाया गडद होत असताना अकोले तालुक्यातील धरणे ही तालुक्याच्या हक्काच्या पाण्याचा प्रमुख आधार आहेत. शासनाचा अधिकृत पाणीवाटप कार्यक्रम जाहीर झालेला नसतानाही काही ठराविक नेत्यांच्या राजकीय दबावामुळे भंडारदरा, निळवंडे, आढळा, सांगवी, अंबित आणि पिंपळगाव खांड या धरणांतील पाण्याचा वापर केला जात असल्याचा आरोप शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने केला आहे. भविष्यातील पाणीटंचाई आणि दुष्काळाची तीव्रता लक्षात घेता अकोले तालुक्याच्या पाण्याचे योग्य नियोजन करावे, या मागणीसाठी पक्षाच्या वतीने तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.

या वेळी तहसीलदारांना देण्यात आलेल्या निवेदनात पाण्यावर सर्वांचा समान अधिकार असल्याचे नमूद करून, ठराविक नेत्यांच्या राजकीय दबावामुळे अकोले तालुक्याच्या खरीप पिकांच्या आवर्तनावर तसेच पिण्याच्या पाण्यावर अन्याय का, असा सवाल करण्यात आला.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांची मशाल हातात घेऊन पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली अकोले तालुका शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) अन्यायाविरुद्ध लढा उभारण्यासाठी सज्ज असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

भविष्यातील पाणीटंचाईचा धोका टाळण्यासाठी पाण्याचे योग्य नियोजन करावे, अशी मागणी करण्यात आली असून, याबाबत तहसीलदारांची भेट घेऊन प्रशासनाला जाब विचारण्यात येणार असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

‘हा लढा केवळ पक्षाचा नसून अकोले तालुक्याचा, येथील शेतकऱ्यांचा आणि पुढील पिढीच्या पाण्याच्या हक्काचा आहे. आज गप्प बसलो तर उद्या पाण्याच्या थेंबासाठी आसुसावे लागेल,’ अशी भूमिका निवेदनातून मांडण्यात आली आहे.

अकोले तालुक्यातील भंडारदरा व निळवंडे यांसह छोट्या-मोठ्या धरणांतील पाण्याचे दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन नियोजन करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. गेल्या २५ दिवसांपासून निळवंडे धरणातून प्रवरा नदीपात्रात आवर्तन सुरू असून, मोठ्या प्रमाणात पाणी वाहून जात असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

एकाच आवर्तनात तीन टीएमसीपेक्षा अधिक पाणी खर्च होणे योग्य नसून पाण्याची ही उधळपट्टी थांबवावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच पिंपळगाव खांड व आढळा धरणांमध्ये उपलब्ध असलेल्या पाण्याचे नियोजन कसे करणार, शेतीसाठी आणि पिण्याच्या पाण्यासाठी किती आवर्तने सोडणार, याचे स्पष्ट नियोजन प्रशासनाने करावे, अशी मागणी करण्यात आली.

अकोले तालुक्याचा पाण्याचा हक्क अबाधित ठेवून उर्वरित पाण्याबाबत निर्णय घ्यावा, अशीही मागणी करण्यात आली आहे.

दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांसाठी चारा छावण्या सुरू करणे, शेतकऱ्यांना कर्जमाफी देणे तसेच महिला बचत गटांची कर्जमाफी करण्याबाबत गांभीर्याने विचार करावा, या प्रमुख मागण्याही निवेदनातून करण्यात आल्या आहेत.



शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख जगदीश चौधरी, उपजिल्हाप्रमुख प्रभाकर फापाळे, अकोले तालुकाप्रमुख महेशराव नवले, शहराध्यक्ष नितीन नाईकवाडी, ज्येष्ठ नेते माधवराव तिटमे, बाळासाहेब कुमकर, गणेश अस्वले, बाळासाहेब देशमुख, केतन भांगरे, दिलीप नवले, अजित हासे, बाळासाहेब नेहे, भरत नवले, रामदास वामन, रावसाहेब वाकचौरे, अतुल लोहटे, दिलीप गोर्डे, राहुल गोर्डे, लखपती कोटकर, भरत झोळेकर, देवचंद नवले, रामकृष्ण आवारी, रमेश आवारी, मिलिंद नाईकवाडी, नानासाहेब वाकचौरे, साईनाथ नवले, नागेश नाईकवाडी, विकास शेटे, केशव शेटे आदींच्या निवेदनावर स्वाक्षऱ्या आहेत.

निवासी नायब तहसीलदार किसन लोहरे यांनी शिवसेनेच्या मोर्चाला सामोरे जात मागण्यांचे निवेदन स्वीकारले. यावेळी उपस्थित शिवसैनिकांनी शासनाच्या विरोधात घोषणाबाजी केली.

# ‘ट्रेकॅम्प’चे तीन सदस्य झाले अधिकृत ‘टूर गाईड’

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
स्थानिक पर्यटनस्थळांची माहिती पर्यटकांना अभ्यासपूर्ण पद्धतीने मिळावी आणि पर्यटन संवर्धनाला चालना मिळावी, या उद्देशाने महाराष्ट्र पर्यटन संचालनालय आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टुरिझम अँड ट्रॅव्हल मॅनेजमेंट (आयआयटीटीएम), ग्वाल्हेर यांच्या वतीने विशेष पर्यटक मार्गदर्शक (टूर गाईड) प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात येतो. या प्रशिक्षणात अहिल्यानगर येथील ‘ट्रेकॅम्प’ या गिर्यारोहक संस्थेच्या तीन सदस्यांनी यशस्वीरीत्या सहभाग नोंदविला. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांना शुक्रवारी नाशिक येथे प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. त्यामुळे हे तिघेही आता महाराष्ट्र पर्यटन संचालनालयाचे अधिकृत टूर गाईड झाले आहेत.



पर्यटन संचालनालयाच्या नाशिक येथील उपसंचालक कार्यालयामार्फत या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. आयआयटीटीएम, ग्वाल्हेर येथील तज्ज्ञ प्रशिक्षक चंद्रशेखर बरुआ यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. पर्यटन क्षेत्रातील व्यावसायिक कौशल्ये, पर्यटकांशी संवाद साधण्याची पद्धत, ऐतिहासिक व स्थापत्य वारशाचे महत्त्व, पर्यटकांची सुरक्षितता आणि प्रत्यक्ष क्षेत्रभेटीद्वारे पर्यटनस्थळांचा अभ्यास अशा विविध विषयांचे सखोल प्रशिक्षण या अभ्यासक्रमात देण्यात आले.

या प्रशिक्षणात ‘ट्रेकॅम्प’चे करिश्मा कोठारी-जोशी, पिपिलिकेश्वर जाधव आणि साहील बेदमुथा यांनी सहभाग घेतला. प्रशिक्षणानंतर घेण्यात आलेल्या मूल्यमापन चाचणीत त्यांनी यश संपादन केले.

शुक्रवारी नाशिक येथील पर्यटन भवनात पर्यटन संचालनालयाचे उपसंचालक नंदकुमार राऊत यांच्या हस्ते प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. प्रशिक्षण पूर्ण केलेले हे तिघे आता अधिकृत पर्यटक मार्गदर्शक म्हणून कार्यरत राहतील. पर्यटकांना अधिकृत आणि विश्वासार्ह मार्गदर्शन मिळावे, यासाठी या गाईड्सची नावे महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार आहेत.

‘ट्रेकॅम्प’च्या माध्यमातून दुर्गभ्रमंती, हेरिटेज वॉक आणि पर्यावरण संवर्धनाचे कार्य केले जाते. संस्थेच्या तीन सदस्यांना मिळालेल्या या शासकीय मान्यतेमुळे पर्यटनस्थळांचा इतिहास, सांस्कृतिक वारसा आणि महत्त्व यांची माहिती पर्यटकांपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचविण्यास मदत होणार आहे. पर्यटकांना अधिक दर्जेदार, माहितीपूर्ण आणि विश्वासार्ह अनुभव देण्याच्या दृष्टीने हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

या यशाबद्दल विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी ‘ट्रेकॅम्प’च्या चमूचे अभिनंदन केले. या यशासाठी संस्थेचे संस्थापक विशाल लाहोटी आणि सहसंस्थापक मेघा लाहोटी यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच पर्यटन विभागाचे विजय जाधव, शिवाजी गायकवाड आणि अजीमुद्दिन शेख यांचेही सहकार्य मिळाले.

# कौठ्यात शेतकऱ्याचा वहिवाट रस्ता प्रशासनाकडून खुला

**महसूल व पोलिसांच्या उपस्थितीत कार्यवाही । शिव-पाणंद शेतरस्ते चळवळीचा पाठपुरावा**

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**
कौठा येथे कालिदास बारकू डोके यांच्या कुटुंबाचा वहिवाट रस्ता ७ ऑक्टोबर रोजी महसूल व पोलीस प्रशासनाच्या उपस्थितीत खुला करण्यात आला. अप्पर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि तहसीलदार सचिन डोंगरे यांच्या आदेशाने ही कार्यवाही करण्यात आली.



शिव-पाणंद शेतरस्ते चळवळीचे संस्थापक व राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला या प्रकरणात यश आले. चळवळीचे कायदे सल्लागार ॲड. गोरख कडूस पाटील यांनीही रस्ता खुला करण्यासाठी पाठपुरावा केला.

मंडळ अधिकारी संदीप तरटे, तलाठी अश्विनी श्राद्धे, पोलीस कॉन्स्टेबल राहुल पाचारणे तसेच त्यांच्या सहकाऱ्यांच्या उपस्थितीत रस्ता खुला करण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली. रस्ता खुला झाल्याने संबंधित शेतकरी कुटुंबाची शेतीपर्यंत ये-जा करण्याची अडचण दूर झाली असून, ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

## शेतरस्त्यांसाठी कायदेशीर मार्गाने पाठपुरावा

■ शेतकऱ्यांच्या शेतरस्त्यांचे प्रश्न कायदेशीर मार्गाने, प्रशासकीय समन्वयातून आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्याने सोडविण्यासाठी दादासाहेब जंगले पाटील यांच्या पुढाकारातून शिव-पाणंद शेतरस्ते चळवळ कार्यरत आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या शेतापर्यंत जाण्या-येण्यासाठी आवश्यक असलेले रस्ते खुले करण्यासाठी चळवळीच्या माध्यमातून प्रशासकीय पातळीवर पाठपुरावा केला जात आहे.

# आ. विवेक कोल्हे यांच्या धडाकेबाज नेतृत्वाने आ. काळे यांच्या पोकळ आश्वासनांचा फुगा फुटला

**भाजपा शहराध्यक्ष वैभव आढाव यांचा पलटवार । सुनील गंगूले म्हणजे स्वीकृत नगरसेवकपदाच्या ‘गाजराचे’ भुकेले**

**● कोपरगाव । वीरभूमी –**
काहीतरी पद किंवा लाभ मिळेल या आशेने नेत्याला खूश करण्यासाठी धडपडणाऱ्या सुनील गंगूले यांच्यासारख्या कार्यकर्त्यांना आगामी काळात स्वीकृत नगरसेवकपदाचे ‘चॉकलेट’ मिळावे, यासाठीच टीका-टिप्पणी करण्याची घाई झाल्याचा आरोप भाजपचे शहराध्यक्ष तथा नगरसेवक वैभव आढाव यांनी केला आहे.



आ. आशुतोष काळे यांच्या नेतृत्वाखालील ‘चार हजार कोटींच्या विकासकामांचा’ फुगा आ. विवेकभैय्या कोल्हे यांच्या धडाकेबाज व प्रभावी कार्यशैलीमुळे फुटला आहे. त्यामुळे काळे गटाकडून कोल्हे कुटुंबाविरोधात जळफळाट सुरू असल्याचा जोरदार पलटवार आढाव यांनी केला.

आढाव म्हणाले की, आगामी काळात स्वीकृत नगरसेवकपदाचे ‘चॉकलेट’ मिळावे, या अपेक्षेने सुनील गंगूले चर्चेत राहण्यासाठी धडपडत आहेत. काळे यांच्या नेतृत्वातील ‘चार हजार कोटींच्या विकासकामांचे’ पितळ जनतेने उघडे पाडले असून, नगरपरिषद निवडणुकीत जनतेने त्यांना धूळ चारली आहे. या पराभवाची पोटदुखी अद्यापही ठसठसत असल्याने स्नेहलताताई कोल्हे आणि आ. विवेकभैय्या कोल्हे यांच्यावर टीका करून राजकीय पोट भरण्याचे काम काळे गटाच्या कार्यकर्त्यांना करावे लागत असल्याची टीकाही त्यांनी केली.

कोल्हे कुटुंबाने केलेल्या विकासकामांवर टीका करून आपले निष्क्रियतेचे पाप झाकण्याचा प्रयत्न करू नका. त्याऐवजी आपण प्रत्यक्षात काय काम केले, हे जनतेसमोर दाखवा, असे आव्हान आढाव यांनी गंगूले यांना दिले.

तुम्हाला हौस असेलच, तर तुमच्या कारभाराचे नमुने जनतेसमोर मांडण्याची वेळ आणू नका. अन्यथा गंगूले यांना चारचौघांत बसणेही कमीपणाचे वाटेल. ‘समझने वाले को इशारा काफी है,’ असा सूचक इशाराही आढाव यांनी दिला.

जास्त खोडसाळपणे बोलण्यापेक्षा आपल्या नेतृत्वाला आ. विवेकभैय्या कोल्हे यांच्याप्रमाणे जनतेच्या प्रश्नांवर काम करण्याचा सल्ला द्यावा, असा उपरोधिक टोलाही भाजपचे शहराध्यक्ष तथा नगरसेवक वैभव आढाव यांनी सुनील गंगूले यांना लगावला.

# केळी-कोतूळ केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धांना प्रारंभ

**खो-खो, कबड्डी, व्हॉलीबॉलसह विविध मैदानी खेळांत विद्यार्थ्यांचा सहभाग**

**● अकोले । वीरभूमी–**
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, राजूर यांच्या अंतर्गत केळी-कोतूळ येथे केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. दि. ९ ते ११ ऑक्टोबरदरम्यान होणाऱ्या या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन सहाय्यक प्रकल्प अधिकारी मनोज पैठणकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि क्रीडाध्वजारोहण करून उत्साहात करण्यात आले. या स्पर्धांना विविध आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला आहे.

दुर्गम आणि आदिवासी भागांतील विद्यार्थ्यांमधील सुप्त क्रीडागुणांना वाव मिळावा, त्यांच्यात शिस्त, सांघिक भावना, खिलाडूवृत्ती आणि नेतृत्वगुण विकसित व्हावेत, या उद्देशाने स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात मिळणाऱ्या संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहाय्यक प्रकल्प अधिकारी मनोज पैठणकर यांनी उद्घाटनप्रसंगी केले.



विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासून क्रीडासंस्कृती रुजविणे, आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे आणि खेळांच्या माध्यमातून सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास साधणे, हा या स्पर्धांमागील प्रमुख हेतू आहे.

या केंद्रस्तरीय स्पर्धांमध्ये विविध आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे. खो-खो, कबड्डी, व्हॉलीबॉल आणि हँडबॉल या सांघिक खेळांसह धावण्याच्या विविध शर्यती, लांब उडी, उंच उडी, गोळाफेक आणि थाळीफेक अशा मैदानी क्रीडा प्रकारांचा समावेश आहे. आपले कौशल्य सिद्ध करून मैदान गाजविण्यासाठी खेळाडूंमध्ये उत्साह आणि चुरस पाहायला मिळत आहे.

उद्घाटनप्रसंगी केळी-कोतूळचे सरपंच चंद्रकांत भवारी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शंकर तळपे, उपाध्यक्ष ज्ञानदेव वायाळ आणि समिती सदस्य गोविंद गोडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच विविध शाळांचे मुख्याध्यापक व्ही. एम. देशमुख, विष्णू नेहे, पंडित कदम, चंदन बडवे, शेख सर, नवनाथ गायकवाड आणि मालाव सर उपस्थित होते. मान्यवरांनी खेळाडूंचा उत्साह वाढविला.

स्पर्धांचे मुख्य आयोजक मुख्याध्यापक गणेशकुमार कागदे यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा महोत्सवाचे नियोजन करण्यात आले आहे. स्पर्धा सुरळीत आणि पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी क्रीडाशिक्षक, पंच, गुणलेखक, आश्रमशाळांचे अधीक्षक व अधीक्षिका, आरोग्य परिचारिका तसेच विविध शाळांतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी परिश्रम घेत आहेत.